# भुयारी मेट्रोच्या रुळांचा पहिला संच मुंबईत

**मुंबई** : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मार्गाच्या रेल्वे रुळांचा पहिला संच मुंबईत दाखल झाला आहे. मेसर्स मित्सुई कंपनी लिमिटेडने पाठवलेला हा संच जपानमधील यावाटा येथून ४ आठवड्यांच्या कालावधीत सागरी मार्गाने मुंबईत आणण्यात आला आहे. अचूक तापमान नियंत्रण आणि मजबुती ही वैशिष्ट्य असलेली ३६१५ मे. टन वजन असलेल्या हेड हार्डन (एचएच) प्रकारच्या रुळ यंत्रणेचे आगमन हे मुंबई मेट्रो ३ च्या पूर्णत्वाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे. उर्वरित ७१२५ मे. टन वजनाचे रूळ दोन संचांमध्ये यंदा वर्षअखेरीस मुंबईत दाखल होतील.

ही रूळ यंत्रणा उच्च प्रतीची आणि अत्यल्प



कंपने देणारी हाय एटीन्यूएशन लो व्हायब्रेशन पद्धतीची असून भारतात ही यंत्रणा प्रथमच वापरण्यात येत आहे. मेट्रो धावत असताना कमीत कमी कंपने आणि ध्वनी निर्माण करणे हीदेखील या यंत्रणेची खासियत आहे. मुंबईतील प्राचीन वास्तू यांना इजा न पोहोचण्याच्या दृष्टीनेही ही यंत्रणा उपयुक्त असल्याची माहिती एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी दिली आहे. तसेच ही यंत्रणा इतर सामान्य यंत्रणांच्या तुलनेत २० ते २२ व्हीडीबी इतकी कंपन गती कमी करणारी असून सुरक्षिततेच्या दृष्टीने परिपूर्ण असल्याचेही देओल यांनी स्पष्ट केले. जलद आणि सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देणाऱ्या मुंबई मेट्रो ३ च्या बांधकाम पूर्णत्वाच्या दृष्टीने ही यंत्रणा अत्यावश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाने कोविड-१९ संबंधी नेमून दिलेल्या नियमावलीनुसार हा रुळांचा संच मुंबई बंदरातून बीकेसी येथील एमएमआरसीच्या यार्डात काही दिवसातच सुरक्षितपणे पोहोचेल, असे एमएमआरसीएलकडून स्पष्ट करण्यात आले आहे.